## अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक ०४.११.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक ४२ :-** अमरावती महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सहा. निवडणुक अधिकारी या मंजूर पदाला मा. सर्वसाधारण सभेची पुन:च्छ मंजुरी मिळणे बाबत व पदोन्नती नियुक्तीचे प्रमाणाची अट रद्द करुन नियुक्तीचे प्रमाणे १००% सरळ भरतीने करण्याबाबत.

**ठराव क्रमांक ४२ :-** अमरावती महानगरपालिकेमध्ये सेवा प्रवेश नियम-२००७ आणि आकृतीबंधात मंजूर पदांबाबत सभेचे मंजूरीकरीता सभेसमोर सादर करण्यात आले. त्यावर मा. सर्वसाधारण सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. सद्यस्थितीत, अमरावती महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वर्ग १ ते ४ ची मंजुर पदे आहे. अमरावती महानगरपालिकेतील विविध मंजूर पदाबाबत सन १९८३ ते सन १९९२ दरम्यान विविध ठराव पारीत करण्यात आले होते. मंजूर पदामधील काही पदांची ठराव उपलब्ध असून सहा. निवडणुक अधिकारी या मंजूर पदाचा ठरावाबाबतचे अभिलेख उपलब्ध नसल्यामुळे आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम तयार करताना कोणतीही तांत्रिक अडचण निर्माण होवू नये म्हणून सहा. निवडणुक अधिकारी या पदाचा पुन:च्छ मंजुरी करीता तसेच सन २००७ मध्ये मा. सर्वसाधारण सभेने मंजुर करण्यात आलेल्या सेवाप्रवेश नियमात पदोन्नती/ प्रतिनियुक्ती च्या तक्त्यात सहा. निवडणुक अधिकारी या पदाकरीता सेवाज्येष्ठतेनुसार नियुक्तीचे प्रमाण १००% पदोन्नतीद्वारे असेल असे दर्शविण्यात आले आहे.

अमरावती महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक सन २०२२-२०२३ मध्ये होणार आहे. त्यादृष्टीने अमरावती महानगरपालिकेचा प्रारुप प्रभाग रचनेचा कच्चा आराखडा तयार करण्याकरीता समिती गठीत करण्यात आलेली आहे. गठीत करण्यात आलेल्या निवडणुक समितीचे कामकाज अतिशय पारदर्शीपणे व अधिक जलद गतीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने अमरावती महानगरपालिका आस्थापनेवर सहा. निवडणुक अधिकारी या पदावर पदनिर्देशित अधिकारी असणे आवश्यक आहे. यास्तव सन २००७ च्या सेवाप्रवेश नियमात सहा. निवडणुक अधिकारी या पदामध्ये पदोन्नती/प्रतिनियुक्तीच्या तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या पदोन्नती नियुक्तीचे प्रमाणाची अट रद्द करुन नियुक्तीचे प्रमाण १००% सरळ भरतीने करण्याबाबत सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळणे बाबत प्रशासकीय विषय सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा/-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा/-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव